# प्रकरण २ रे : पर्यटनाचे घटक (Component of Tourism)

**२.१ भौगोलिक घटक**

**२.२ सामाजिक घटक**

**२.३ सांस्कृतिक घटक**

**२.४ इतर घटक**

**प्रास्ताविक:-**

पर्यटन हा झपाट्याने विकसित होणारा मानवाचा आर्थिक व्यवसाय आहे. जागतिक पर्यटकांच्या संख्येत आणि पर्यटनापासून मिळणाऱ्या उत्पादनात सातत्याने वाढ होत आहे. जगातील विकसित देशांमध्ये अविकसित देशांपेक्षा पर्यटनाचा विकास जास्त झालेला आहे. हा विकास अनेक घटकावर अवलंबून असतो. त्यामध्ये भौगोलिक घटक, सामाजिक घटक, सांस्कृतिक घटक व इतर काही घटकांचा समावेश होतो. त्या सर्व घटकांचा पर्यटन विकासावर परिणाम होतो. त्याचा सविस्तर आढावा पुढील प्रमाणे.

## २.१ भौगोलिक घटक (Geographical components)

सर्व सामान्य पर्यटकांना भौगोलिक पर्यटन स्थळाचे जास्त आकर्षण असते. निसर्गरम्य पर्यटन स्थळी पर्यटक आपले देहभान हरपून जातात. निसर्गातील वेगवेगळे पणामुळे पर्यटक आपल्या पसंतीनुसार त्याची निवड करतात. निसर्गामध्ये सृष्टी सौंदर्याचे अनेक अविष्कार पहावयास मिळतात. प्रत्येक अविष्कार पाहावयास पर्यटक आपल्या आवडीनुसार पर्यटन स्थळाची करतात त्या सर्व भौगोलिक घटकांचा आढावा पुढीलप्रमाणे देता येईल.

१. भूउठाव / भूरूपे

२.हवामान

३.नैसर्गिक वनस्पती

४.प्राणी जीवन

५.जलाशय

**१. भूउठाव / भूरूपे (Relief)**

पर्यटन विकासावर भूउठावाचा परिणाम झालेला दिसून येतो. भूपृष्ठावर भूउठावामध्ये कमालीची विविधता आढळते. उंच पर्वतरांगा, हिमाच्छादित पर्वत शिखरे, उघडे बोडके डोंगर, नद्यांच्या खोल दऱ्या, घळई, हिमनद्यांच्या विस्तृत पात्रे, विशाल मैदाने, विस्तृत पठारे, सफाट मैदाने, विशाल सागर किनारे मानवाला नेहमीच साद घालीत आहेत. अशा ठिकाणी काही काळ व्यतीत करावा असे प्रत्येकालाच वाटते. ही भूरूपे पर्यटकांची प्रमुख आकर्षणे बनलेली आहेत. त्यातील काही चे विवेचन पुढील प्रमाणे:-

I.पर्वत व डोंगररांगा (Mountains & Hills)

II. दऱ्या, घळई (Gorge, Valleys)

III.पठार व मैदाने (Plateau and Plain Region)

IV. बेटे (Islands)

V. ज्वालामुखी पासून निर्माण झालेली भूरूपे (Volcano Landform)

VI.प्रवाळ बेटे (Coral Reefs)

**I.पर्वत व डोंगररांगा (Mountains & Hills)**

पर्वत हे नाव नैसर्गिकरित्या इतर भूस्तराहून उंच असलेल्या भौगोलिक रचनेसाठी वापरले जाते. पृथ्वीवरील २४ टक्के भूभाग पर्वतांनी व्यापला आहे. ह्यापैकी आशिया खंडात ६४ टक्के, युरोपा २५ टक्के, दक्षिण अमेरिका खंडात २३ टक्के ऑस्ट्रेलियामध्ये १७ टक्के तर आफ्रिकेत ३ टक्के जमिनीचा समावेश होतो. उंच पर्वतीय प्रदेशात तेथील गिरिशिखरे, दऱ्याखोरी, बर्फ, बर्फावरील घसरगुंडी, गिर्यारोहन व तेथील निसर्ग पाहण्यासाठी पर्यटक या ठिकाणी भेटी देतात. पर्वत व डोंगर डोंगराळ प्रदेशात वन्य पशुपक्ष्यांची अभयारण्य, ऋतू बदलाचे विहंगम दर्शन घडते, सुर्योदय, सुर्यास्त मनोहर असतात याच क्षेत्रातील घनदाट जंगलातून फिरताना लोक अंतर्मुख होतात. फळा-फुलांनी बहरलेले शेकडो वृक्षवेली मनाला आनंद देतात, हिवाळ्यात पर्वत शिखरे हिमाच्छादित असतात तर वसंत ऋतूत सृष्टी गर्द हिरवी दिसते. पर्वतीय हवामान, सृष्टी सौंदर्याने नटलेले व आरोग्यवर्धक असते. प्रदुषण मुक्त वातावरणात लोकांना उत्साह वाटतो त्यामुळे येथे पर्यटक गर्दी करतात. उदा. हिमालय, रॉकी, इत्यादी

तसेच पर्वतीय भागात काही थंड हवेची ठिकाणे म्हणून प्रसिद्ध झालेली आहेत उदा. भारतात डेहराडून, सिमला, दार्जिलिंग, मसूरी, महाबळेश्वर ही अत्यंत लोकप्रिय पर्यटन स्थळे आहेत. दर वर्षी

हजारो देशी-परदेशी पर्यटक या पर्यटन स्थळांना भेटी देतात. त्यामुळेच भौगोलिक घटकांमधील पर्वत व डोंगर रांगा या पर्यटकांच्या दृष्टीने सर्वात महत्वाचे आहेत.

**II. दऱ्या, घळई (Gorge, Valleys)**

उंच हिमाच्छादित गर्द हिरव्यागार जंगलाने आच्छादलेल्या पर्वतीय व डोंगर रांगा प्रमाणेच पर्यटक दऱ्या, घळई याकडेही आकर्षित होतात. पूर्वीपेक्षा अधिक संख्येने पर्यटक अशा ठिकाणी गर्दी करीत आहेत. दरीतील प्राकृतिक सौंदर्य वैशिष्ट्यपूर्ण असते. दरीनुसार सौंदर्याची प्रत वेगळी असते. जबलपूर जवळील नर्मदा नदीच्या संगमरवरी दरीचे सौंदर्य व अमेरिकेतील कोलोरॅडो घळईपेक्षा वेगळे आहे. हिमाचल प्रदेशातील व्हॅली ऑफ फ्लॉवर्स अनेक दृष्टीने केरळातील सायलेंट व्हॅली प्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. या दऱ्या, घळई जंगल व्याप्त आहेत. त्यातून नागमोडी वळण घेत नद्या वाहतात त्याचे काठ तीव्र स्वरूपाचा उताराचे आहेत, तळ सखल सफाट असतात. पूर्व मध्य आफ्रिकेतील रिफ्ट व्हॅली हे लेखनीय उदाहरण आहे .

उत्तर प्रदेशातील हिमालयातील व्हॅली ऑफ ड्रूनस, तिहेरी व्हॅली (गडवाल हिमालय) काश्मिरातील किड्ड्र व्हॅली सुद्धा पर्यटकांना आकर्षित करू शकतात. परंतु वाहतूक व अन्य कारणांनी या क्षेत्राचा पर्यटन स्थळ म्हणून विकास झालेला नाही.

**III.पठार व मैदाने (Plateau and Plain Region)**

पठार व मैदानी प्रदेशात पर्यटनाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे उदा. पाचगणीचे पठार, गंगेचे मैदान इत्यादी

**IV. बेटे (Islands)**

सर्व बाजूने पाण्याने वेढलेल्या खंड भूमीस बेट असे म्हणतात. बेट हे निसर्गसौंदर्याने नटलेले असते म्हणून पर्यटक बेटाकडे आकर्षित होतात. बेटाच्या जवळ असलेले सुंदर आकर्षक बागा, नारळाची, पोफळीची झाडे, सुंदर सोनेरी वाळू, पर्यटकांना आकर्षित करतात उदा. मॉरिशस बेट, हवाई बेटे

**V. ज्वालामुखी पासून निर्माण झालेली भूरूपे (Volcano Landform)**

ज्वालामुखी हा एक निसर्गाचा रुद्र अविष्कार आहे. ज्वालामुखी हे पृथ्वीच्या पृष्ठभागाला पडलेली भेग किंवा नळीसारखे भोक असते ज्यामधून पृथ्वीच्या पृष्ठभागाखालील तप्त शिलारस (मॅग्मा), उष्ण वायू, राख इत्यादी बाहेर पडतात. सर्वसामान्य ज्वालामुखी क्रियेत

मध्यवर्ती नळीच्या वाटे तप्त शिलारस बाहेर येऊन नळीभोवती लाव्हा आणि राख यांची रास साचते व शंकूच्या आकाराचा उंचवटा तयार होत जातो, त्याला ज्वालामुखी पर्वत म्हणतात. ज्वालामुखीचे रौद्र रूप पाहण्यासाठी पर्यटक आकर्षित होत असतात म्हणूनच जपानमधील फूजियमा भूमध्य सागरातील व्हॅलकूंनो,पिलीयन स्ट्रबोली या ज्वालामुखी प्रदेशात पर्यटकांची गर्दी असते.मृत ज्वालामुखीच्या खोल मुखामध्ये पाणी साचून क्रेटर लेक तयार होतो. त्याचा कडा एकदम उभा असतो. ते सौंदर्य सुद्धा आकर्षक असते. ते पाहण्यासाठी सुद्धा पर्यटक गर्दी करतात. एकंदरीत ज्वालामुखीमुळे निर्माण होणारी भूरूपे पर्यटकांना आकर्षित करतात.

**VI.प्रवाळ बेटे (Coral Reefs)**

प्रवाळ बेटे उष्णकटिबंधातील साधारण१०अंश ते 30 अंश अक्षवृत्ताच्या दरम्यान उथळ सागर किनाऱ्यावर प्रवाळ कीटकापासून अत्यंत सुंदर पारदर्शी रंगीबिरंगी स्फटिकासारखा पाण्याखालील प्रवाळ कीटकापासून प्रवाळ खडकांची निर्मिती होते. हे प्रवाळ खडक अत्यंत विलोभनीय व सुंदर दिसतात. महासागरात पाण्याखाली जाऊन ते पाहण्याचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक अशा पर्यटन ठिकाणी गर्दी करतात. अशी पर्यटन केंद्रे केवळ उष्ण कटिबंधात आहेत. ऑस्ट्रेलिया खंडाच्या पूर्व किनाऱ्यावरील जगप्रसिद्ध दि ग्रेट बॅरियर रीफ हे याचे उत्कृष्ट उदाहरण होय. दरवर्षी देशी-विदेशी हजारो पर्यटक येथे भेटी देतात. भारतात सध्या अंदमान निकोबार व दीप समूह जवळ सागरी प्रदेशात या प्रवाळ बेटांचा आनंद लुटण्यासाठी भारतीय पर्यटक आकर्षित होत आहेत. संयुक्त संस्थांच्या पूर्व किनाऱ्यावरील फ्लोरिडा रीफ अमेरिकन लोकांचे आवडते पर्यटन स्थळ आहे.

**२.हवामान(Climate)**

स्वच्छ व आल्हाददायक हवामान असलेल्या भागात पर्यटक नेहमीच गर्दी करतात या उलट आकाश शक्यतो ढगाळ वातावरण असते अशा ठिकाणी पर्यटन विकासाला प्रतिकूल परिस्थिती निर्माण होते. तापमान, प्रजन्य, हिम हे वातावरणाचे अविष्कार पर्यटन विकासावर परिणाम करतात.

**I.तापमान (Temperature)**

उष्णकटिबंधात मात्र हिवाळ्या पेक्षा उन्हाळे त्रासदायक असतात म्हणून तेथील लोक पर्वत भागातील थंड हवेच्या ठिकाणी उन्हाळ्यात गर्दी करतात. उदा. महाराष्ट्रातील महाबळेश्वर, लोणावळा, दक्षिण भारतातील उटी, हिमालयातील शिमला, मसुरी, श्रीनगर, दार्जिलिंग ही उल्लेखनीय थंड हवेची पर्यटन स्थळे आहेत.

समशीतोष्ण कटिबंधातील देशात हिवाळ्यात जेथे वातावरण उबदार व सूर्यप्रकाश युक्त असते तेथे पर्यटनाचा विकास झालेला दिसून येतो. उदा. अमेरिकेत दक्षिण किनाऱ्यावरील फ्लोरिडा येते हिवाळा उबदार व सूर्यप्रकाश युक्त असल्याने तेथे हिवाळ्यात हजारो पर्यटक गर्दी करतात.

**II. पाऊस (Rainfall)**

पर्यटकांना पाऊसाची आवड नैसर्गिक असते. पाऊसाचा परिणाम पर्यटन व्यवसायावर होत असतो. अति जास्त पाऊस, सतत लागून राहणारा पाऊस, पर्यटकांना आवडत नाही. उदा. भारतातील ईशान्य भागातील राज्य यामुळेच तेथे पर्यटनाचा विकास कमी झालेला आहे. याउलट रिमझिम पाऊसात मनसोक्त फिरण्याची मजा पर्यटकांना मात्र साद घालत असते उदा.माथेरान, आंबोली, पंचमठी, महाबळेश्वर इत्यादी

**III.हिम (Snow)**

पृथ्वीवरील उत्तर व दक्षिण ध्रुव भागात अतिशीत हवामान आढळते. त्यामुळे हा प्रदेश नेहमी बर्फाच्छादित असतो. अतिशय थंड हवामानामुळे वर्षातील बहुतेक दिवस येथे बर्फवृष्टी होत असते. उन्हाळ्यात काही पर्यटक या ठिकाणी पर्यटनास येतात. अतिशय थंड हवामानामुळे या भागात पर्यटकांची संख्या कमी आढळते. हिमवृष्टीचा अनोखा आविष्कार पाहण्यासाठी पर्यटक उंच पर्वतीय प्रदेशात गर्दी करतात. हिवाळ्यात पर्वतीय प्रदेशात चालणाऱ्या हिवाळी स्पर्धा पर्यटकांचे आकर्षण आहेत.

भारतात जम्मू-काश्मीरमधील गुलमर्ग, सोनमर्ग, पहेलगाम, हिमाचल प्रदेशात डलहौसी, सिमला,कुलू-मनाली, खज्जीयार या ठिकाणी पर्यटकांना हिमवृष्टीचा आनंद अनुभवता येतो. हिवाळी स्पर्धाचे आयोजन केले जाते. युरोपमधील **स्विझरलँड** येथेही ही बर्फाच्छादित क्षेत्रात पर्यटकांची गर्दी असते. काही वेळेला हिमवृष्टीमुळे वाहतुकीच्या सुविधा विस्कळीत होतात. पर्यटकांना काही वेळेला पर्यटन केंद्रावर अडकून पडावे लागते. तरीसुद्धा पर्यटकांची गर्दी या पर्यटन केंद्रावर दिसून येते.

**३.नैसर्गिक वनस्पती (Natural Vegetation)**

वृक्षवेलींनी नटलेला प्रदेश, हिरवाईने सजलेले प्रदेश, पर्यटकांना देहभान विसरायला लावतात. दूरवर पसरलेली गवताळ कुरणे, पर्यटकांना आकर्षित करतात. नैसर्गिक वनस्पतीमध्ये जंगले व गवताळ कुरणे यांचा समावेश होतो हे दोन घटक पर्यटनाच्या विकासावर परिणाम करतात.

**I.वने किंवा जंगले (Forest)**

कोणत्याही प्रदेशातील नैसर्गिक वनस्पती, जंगले, वने ही तेथील नैसर्गिक परिस्थितीच्या घटकाचा संयुक्त परिणाम असतो. जंगलातील वातावरण आल्हादायक, शांत व प्रदूषणमुक्त असते. जंगलात सोबत असते ती तेथील पशुपक्ष्यांची, खळखळणाऱ्या झऱ्याची, शीळ घालत जाणाऱ्या वाऱ्यांची, असे वातावरण पर्यटकांना नेहमी आकर्षित करते म्हणूनच पर्यटक अशा जंगलव्याप्त पर्यटन स्थळाकडे धाव घेतात. महाबळेश्वर, श्रीनगर, सिमला, मसूरी, दार्जिलिंग ही भारतातील थंड हवेची ठिकाणे आहेत असे नव्हे तर जंगलांनी आच्छादलेली ठिकाणे आहेत त्यामुळे अगदी हिवाळ्यात, पावसाळ्यात सुद्धा ही पर्यटनस्थळे पर्यटकांनी सदा भरलेली असतात. पर्वतीय व डोंगररांगातील पर्यटन ठिकान जंगलाचे लेणे लाभलेले असते. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वात भर पडते. पश्चिम घाटातील आंबा,फोंडा ही ठिकाणे कोल्हापूर, सांगली भागातील पर्यटकांना अति आवडतात कारण ती जंगल व्याप्त आहेत.

**II.गवताळ कुरणे (Grasslands)**

हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमालीचे या सुंदर कवितेचा अर्थ गवताळ कुरणात फिरताना पर्यटकांना निश्चित समजतो. पृथ्वीवर उष्ण आणि समशीतोष्ण कटिबंधांत कोरड्या हवेचे ओसाड, वाळवंटी प्रदेश आणि आर्द्र हवेचे अरण्यप्रदेश यांच्या दरम्यान, खंडांच्या अंतर्भागात मुख्यत:गवताने निसर्गतःच आच्छादलेले विस्तृत, सपाट मैदानी किंवा पठारी प्रदेश आढळतात. त्यांना उष्ण कटिबंधात सॅव्हाना व समशीतोष्ण कटिबंधात स्टेप व प्रेअरी म्हणतात.दक्षिण आफ्रिकेत त्यांना व्हेल्ड, दक्षिण अमेरिकेत लानोज, कँपोज, पँपास, आणि ऑस्ट्रेलियात डाउन्स अशीही नावे आहेत. अंटार्क्टिकाशिवाय प्रत्येक खंडात असे विस्तीर्ण तृणप्रदेश आहेत.

ऋतूनुसार गवताळ प्रदेशाचे स्वरूप बदलते पावसाळ्यात हे प्रदेश हिरवेगार गालिचे सारखे दिसतात. पावसाळ्याच्या शेवटी ही हिरवेगार कुरणे पिवळसर होतात. गवताना फुले येतात, हिवाळ्यात हा सर्व प्रदेश पिवळसर दिसतो, उन्हाळ्यात तो उघडा पडतो.

जगातील उष्णकटिबंधीय सॅव्हाना प्रदेश हे तेथील वनस्पती पेक्षा असंख्य असलेल्या वन्य पशुपक्षी साठी जगप्रसिद्ध आहेत. झेब्रा, जिराफ हे वैशिष्ट्यपूर्ण प्राणी केवळ याच प्रदेशात आढळतात.वाघ,सिह,हात्ती ,हरणे,चित्ता,काळवीट,माकडे याशिवाय असंख्य सरपटणारे प्राणी यांनी हा प्रदेश गजबजलेला असतो. प्राण्याबरोबर असंख्य पक्षी आढळतात. या पशुपक्ष्यांना पहाणे त्याचे निरीक्षण करणे त्यांना

नैसर्गिक अवस्थेत वावरताना पाहणे. खरंच आनंददायी असते म्हणून आफ्रिकेचा पूर्व भागातील हायलँड प्रदेशातील युगांडा, केनिया, झांबिया, या देशात दरवर्षी लाखो पर्यटक येतात.

**४. प्राणीजीवन / वन्य पशुपक्षी (wildlife)**

वन्य पशुपक्षी, नैसर्गिक पर्यावरणाचा एक अविभाज्य घटक असून आधुनिक पर्यटन व्यवसायाच्या विकासात या घटकाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. जंगलातील वाघ सिंहाच्या डरकाळयात, हत्ती, सांबर, हरीण, झेब्रा, जिराफ व इतर प्राणी यांचे अस्तित्व आपणास देहभान विसरून करण्यास भाग पाडते. जंगलामध्ये विविध आवाजात गाणारे पक्षी, विविध आकार व रंगाचे पक्षी, नाचणारे मोर पाहून मनाला आनंद होतो. पर्यटन हा मानवी मनाला विरंगुळा आहे. आणि तो या वन्य पशूपक्षाकडून मिळतो परंतु आज काही हौशी पर्यटक वन्य पशुपक्षांची शिकार करण्यासाठी जंगलात जातात. शिकारीमुळे वन्य पशूपक्षाचे प्रमाण कमी होत असून त्याच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये निर्माण केली आहेत. हे पहाण्यासाठी पर्यटक गर्दी करतात.

**I.राष्ट्रीय उद्याने** (National Parks)

नैसर्गिक वनस्पती व वन्य पशुपक्षी यांच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय उद्याने निर्माण केली आहेत. आज देशात १०४(२०१९) राष्ट्रीय उद्याने आहेत. या राष्ट्रीय उद्यानाला दरवर्षी हजारो पर्यटक भेटी देतात. उदा. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

**II.अभयारण्य** (Sanctuaries)

नष्ट होणाऱ्या पशुपक्षाच्या संरक्षणासाठी अभयारण्य निर्माण केली जातात. भारतात ५४३(२०१६) अभयारण्य राखीव आहेत. आपल्या देशात काही प्राण्यासाठी विशिष्ट अभयारण्य फार प्रसिद्ध आहेत. उदा. वाघासाठी नागार्जुन सागर (आंध्र प्रदेश) ताडोबा (महाराष्ट्र) पालामाऊ (बिहार) सुंदरबन (पश्चिम बंगाल) कान्हा (मध्य प्रदेश) जिम कार्बेट नॅशनल पार्क (उत्तर प्रदेश) गेडयासाठी काशीरंगा नॅशनल पार्क (आसाम) सिंहासाठी गिर नॅशनल पार्क (गुजरात) पक्षासाठी केवल देव गाना नॅशनल पार्क (राजस्थान) भरतपुर (राजस्थान) हत्तीसाठी मदुमलाई, उदकमंड/उटी (तामिळनाडू) इत्यादी ही सर्व प्रमुख अभयारण्य पर्यटन केंद्र म्हणून विकसित झालेली दिसून येतात. या ठिकाणी लाखो पर्यटक भेटी देत असतात.

**III.प्राणी संग्रहालय** (Zoo)

प्राणिसंग्रहालयाचाही पर्यटन विकासावर परिणाम होतो. उदा. मैसूर येथील प्राणी संग्रहालय तेथे भारतातील नव्हे तर परदेशातील प्राणी ठेवले आहेत ते पहाण्यासाठी पर्यटक गर्दी करतात.

**५.जलाशय/जलविभाग (Water Bodies)**

नद्या, सरोवरे, धबधबे, उदक फवारे, हिमनद्या, बेटे, समुद्रकिनारे, हे जल आविष्कार मनाला फार प्राचीन काळापासून आपल्याकडे आकर्षित करीत आहेत. या जल विभागाशी संबंधित असलेल्या काही घटकाचे विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

**I.नद्या** (Rivers)

जगातील सर्वच नदीप्रदेश वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांची उगमस्थाने भारतासारख्या देशात पवित्र मानतात म्हणून दरवर्षी हजारो लोक गंगोत्री व यमुनोत्री या हिमालयातील गंगा व यमुना नदीच्या उगमस्थानाचे दर्शन घेण्यासाठी जातात. भारतात नद्यांच्या काठी सर्वाधिक धार्मिक व पवित्र स्थाने असल्याने नद्या व पर्यटन यांचा जवळचा संबंध प्रस्थापित झालेला आहे. हरिद्वार, ऋषिकेश, प्रयाग, वाराणसी ही गंगेच्या काठावरील भारतीयांचे पवित्र स्थान आहेत. यमुनेच्या काठी मथुरा, वृंदावन, भीमेच्या काठी पंढरपूर, कृष्णेच्या काठी औदुंबर, नरसिंहवाडी अशी शेकडो तीर्थस्थाने आपल्या देशात नद्यांच्या काठीच आहेत.

काही नदीप्रदेश घनदाट जंगलाने वेढलेले आहेत उदा. मध्य आफ्रिकेतील झायरे, दक्षिण अमेरिकेतील अमेझॉन. काही नद्यांनी आपली खोरी घळईच्या स्वरूपात निर्माण केलेली आहेत. तेथील सृष्टीसौंदर्य इतर ठिकाणांपेक्षा आगळेवेगळे असते. उदा. जबलपूर जवळील नर्मदेचा संगमरवरी भेंडाघाट, ग्रँड कूनियाल, कोलोरॅडो नदीचे खोरे येथे पर्यटन विकासाचा व्यवसायाचा विकास हा आगळयावेगळया सृष्टीसौंदर्य यामुळेच झालेला दिसून येतो.

**II.सरोवरे** (Lakes)

सरोवरे गोड्या व खारट पाण्याची असतात. गोड्या पाण्याची सरोवरे पर्यटकांच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. येथे निसर्ग सौंदर्याबरोबरच नौकानयनाचा आनंद पर्यटकांना घेतात. सरोवराच्या ठिकाणी घोड्याच्या शर्यत आयोजित केल्या जातात. भारतात लोणार (महाराष्ट्र) चिल्का (ओरिसा) सांबर (राजस्थान) हे खाऱ्या पाण्याची सरोवरे आहेत. दाल, वूलर (जम्मू काश्मीर) कोलेरु (आंध्र प्रदेश) नैनिताल, तिबेट मधील मानस सरोवर ही गोड्या पाण्याची सरोवरे पर्यटन स्थळे म्हणून प्रसिद्ध आहेत. पर्वतीय प्रदेशातील सरोवरे सृष्टी सौंदर्याचे

अप्रतिम दर्शन घडवतात. उदा. भारतातील उटी, महाबळेश्वर, तोरणमाळ येथील सरोवरे, मध्य आफ्रिकेतील हिकोटोरिया सरोवरे, संयुक्तसंस्थाने व कॅनडाच्या सीमेवरील ग्रेट लेक्स इत्यादी पर्यटकांची आवडती पर्यटन स्थळे बनली आहेत.

**III.धबधबा/ जलप्रपात** (Waterfall)

उचीवरून खळखळत खाली पडणारा धबधबा, पांढराशुभ्र असून सूर्यकिरणात तो इंद्रधनुष्या नटलेला असून प्रचंड आवाज करीत खालच्या दरीत कोसळणारा जलप्रपात पाहताना आपण आपले देहभान विसरून जातो.हा जलप्रपात त्याच्या असंख्य धारा खाली दरीत कोसळताना त्याचे जलकण आपल्या अंगावर घेत तासन्तास एकाग्रतेने त्या धबधब्याकडे पाहण्याचा आनंद मनस्वी होतो. या सर्व वैशिष्ट्यामुळे जगातील बहुतेक जलप्रपाता जवळ पर्यटन केंद्रे स्थापन झालेले आहेत. उदा. जगप्रसिद्ध नायगरा धबधबा हा संयुक्त संस्थाने व कॅनडाच्या सीमेवर असून तो सेंट लॉरेन्स नदीवर आहे. दरवर्षी लाखो देशी-विदेशी पर्यटक येथे गर्दी करतात.

भारतामध्येही अशी जलप्रपात पर्यटन स्थळे निर्माण झालेली आहेत उदा. कर्नाटकातील शरावती नदीवरील जोग धबधबा (फॉल्स), घटप्रभा नदी वरील गोकक धबधबा, गोव्यातील दूधसागर धबधबा, महाबळेश्वर येथील लिंगमळा धबधबा, सातारा येथील ठोसेघर धबधबा, कोल्हापूर येथील बरकी धबधबा इत्यादी उल्लेखनीय आहेत.

**IV.उदक फवारे** (Geysers)

भूपृष्ठाखालून ऊन पाण्याचे जोरदार फवारे आकाशात उडतात त्यास उदक फवारे म्हणतात. हे फवारे शक्यतो उष्ण पाण्याचे असतात त्यामध्ये अनेक रसायने असल्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने हे पाणी उपयुक्त असल्याने तेथे आरोग्यधाम निर्माण होतात. ब्रिटिश काळात भारतात वज्रेश्वरी येथे असे आरोग्य धाम बांधण्यात आले. कालांतराने श्रीमंत लोक तेथे गर्दी करू लागल्याने पर्यटन स्थळ म्हणून त्याचा विकास झाला. काही ठिकाणी पाणी कारज्याप्रमाणे वर उडते, संयुक्त संस्थानातील येलोस्टोन पार्कमधील एका फवारा तून एक एक मिनिटाच्या अंतराने पाणी वर उडते याला मिनिट मॅन फवारा म्हणतात. तर याच भागात असणाऱ्या दुसऱ्या फवारण्यातून मात्र बरोबर एक एक तासाच्या अंतराने पाणी बाहेर फेकले जाते त्याला ओल्ड फेथ फुल फवारा म्हणतात. आइसलँड मधील ग्रेट ग्रेसर्स प्रसिद्ध आहे, ठराविक अंतराने या फवारा तून पाणी वर उडते अशा उष्णोदक फवाराचे नैसर्गिक सौंदर्य न्याहाळण्यासाठी पर्यटकांची गर्दी अशा पर्यटन स्थळी होत असते.

**V.हिमनद्या (Glaciers)**

हिमनद्यांच्या प्रदेशात एक वेगळे सौंदर्य असते, अतिथंड हवामान, थंडगार झोंबणारे वारे, सर्वत्र भुरभुर पडणारे हिम, शांत वातावरण, सर्वत्र पांढऱ्या रंगाचे साम्राज्य आणि जवळ जवळ निर्मनुष्य प्रदेश ही या सौंदर्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळेच हिमनद्या पर्यटन विकासावर परिणाम करतात. पर्यटक निरनिराळ्या ऋतूत येथे गर्दी करतात.अलास्का मधील पीटर्स क्रिक, इस्टेट विन, ग्लेशिअर्स, युरोपातील अल्पस पर्वतातील हिमनद्या पर्यटकांचे आकर्षण आहेत. भारतात मात्र याबाबत कमी प्रतिसाद आहे. हिमालयातील गंगोत्री, मिलान, कोसा, कांचनगंगा, रीसो, रुपाल, सियाचीन, कारगिल या नदीच्या प्रदेशात पर्यटकांचा प्रतिसाद कमी आहे.

काही पर्यटकांना हिमालयातील गिरी शिखरांचे आकर्षण असते. यामुळे दरवर्षी हजारो गिर्यारोहक हिमालयातील माउंट एव्हरेस्ट व इतर जगप्रसिद्ध पर्वत शिखरे पादाक्रांत करण्याचा प्रयत्न करतात.

**VI. बेटे (Islands)**

सर्व बाजूने पाण्याने वेढलेल्या खंडभूमीस बेटे असे म्हणतात.चारही बाजूने अथांग निळया महासागर, रुपेरी वाळूची मैदाने, वैशिष्ट्यपूर्ण आदिवासी जीवन संस्कृती, अप्रतिम निसर्गसौंदर्य, यामुळे बेटावर पर्यटन क्षेत्राचा विकास होत आहे. भारताच्या जवळील अंदमान निकोबार, लक्षद्वीप बेटे निसर्गसौंदर्याने भरलेली आहेत. हिंदी महासागरातील मॉरिशस बेट, पॅसिफिक महासागरातील हवाई बेट तेथील अप्रतिम सौंदर्याने पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनले आहेत.

**VII.समुद्रकिनारे (Beaches)**

सागरी बेटापेक्षा सागर किनारी प्रदेशाचे निसर्गसौंदर्य वेगळे असते. समोर अथांग पसरलेला निळाशार समुद्र, त्यावर उडणाऱ्या उंच लाटा, सातत्याने किनाऱ्यावर येऊन आढळणाऱ्या लाटा, भरती-ओहोटीच्या लाटा, खळखळणारा समुद्र ,किनाऱ्यावरील पांढरीशुभ्र रुपेरी वाळू ,त्यावर चमकणारे शंख-शिंपले, मधून मधून दिसणारे स्टार फिश सारखे प्राणी, खेकडे, डॉल्फिन तसेच सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी सूर्य बिंबाचे मनस्वी दर्शन पर्यटकांना आकर्षित करते, त्यामुळेच पर्यटक समुद्र किनाऱ्यांना भेटी देतात उदा. गोवा, मुंबई, गणपतपुळे इत्यादी

**२.२ सामाजिक घटक (**Social components)

सामाजिक घटकांमध्ये धार्मिक व ऐतिहासिक घटकांचा समावेश होतो

**१.धार्मिक घटक** (Religious components)

भारताच्या पर्यटन विकासात इतर घटकापेक्षा धार्मिक घटकाला विशेष महत्त्व आहे. भारत हा अनेक धर्माची जननी आहे. यात हिंदू धर्म, बुद्ध धर्म,शीख,जैन, वैष्णव, अनेक पंथ आहेत. अशा निरनिराळ्या पवित्र धर्मात ख्रिश्चन, मुस्लिम,जू या धर्माचे अनेक पवित्र पर्यटन स्थळे म्हणून देशात विकसित झालेले आहेत. अशा पर्यटन ठिकाणी पर्यटक दरवर्षी मोठ्या संख्येने भेटी देतात.

मंदिरे, समाध्या, दर्गे, गुरुद्वारे आणि गिरिजा घरे (चर्च) पगोडा इत्यादी धार्मिक घटकाचा पर्यटन विकासावर परिणाम होतो.

**I.मंदिरे**

मंदिरे हे हिंदू जैन व बौद्ध धर्माची असतात. तिरुपती, वाराणसी, हरिद्वार, मथुरा, पंढरपूर, तुळजापूर, शिर्डी, ज्योतिबा, कोल्हापूर, ही हिंदू धर्मियांची पवित्र धार्मिक ठिकाणे असून लाखोच्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांमुळे ती गजबजलेली असतात. मुस्लिम धर्मीयांची मक्का मदीना, जुचे जेरुसलेम, ख्रिश्चन व्हाटकिनसिटि येथे वार्षिक उत्सवाच्या वेळी लाखो पर्यटक येतात.

**II.साधुसंताच्या समाध्या**

संत ज्ञानेश्वर महाराजांची समाधी असलेले आळंदी, संत तुकाराम महाराजांची समाधी असलेले देहू, गजानन महाराजांची समाधी असलेले शेगाव, स्वामी स्वरूपानंद महाराजांची समाधी असलेले पावस इत्यादी ठिकाणी भारतातील लाखो पर्यटक भेटी देतात.

**III.दर्गे**

मुस्लिम धर्मीयांमध्ये संताचे व पिराचे दर्गे यांनाही त्याच्या धर्मात पवित्र स्थान आहे. अशी ठिकाणे मुस्लिमांची धार्मिक ठिकाणे समजली जातात. उदा. दिल्ली येथे हजरत निजामुद्दीन यांचा दर्गा आहे, मुंबईला हाजीअली येथे दर्गा आहे. या ठिकाणी उरूस होतात ही ठिकाणे आज धार्मिक पर्यटन स्थळे बनली आहेत

**IV.गुरुद्वारे**

शीख लोकांची गुरुद्वारे धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून ओळखली जातात. अमृतसर येथील सुवर्ण मंदिर, नांदेड येथील गुरुद्वार ही आज धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित होत आहेत.

**V.गिरीजाघरे/चर्चेस**

ख्रिश्चन लोक गिरीजाघरांमध्ये प्रार्थनेसाठी येतात. ही गिरिजाघरे/चर्च धार्मिक ठिकाणे म्हणून विकसित होत आहेत. उदा. गोवा

अशाप्रकारे वरील धार्मिक घटकांचा पर्यटन विकासावर परिणाम होत आहे.

**२.ऐतिहासिक घटक** (Historical components)

पर्यटन विकासात ऐतिहासिक घटकांनाही महत्त्वाचे स्थान आहे. यामध्ये युद्धभूमी,स्मारके, किल्ले, ऐतिहासिक राजवाडे, ऐतिहासिक राजधान्या येतात. याचा पर्यटन विकासावर परिणाम दिसून येतो.

**I.युद्धभूमी**

युद्ध जरी विध्वंसक असले तरी, हजारो-लाखो लोक त्यामुळे जरी मृत्युमुखी पडत असले तरी, प्रचंड प्रमाणात वित्तहानी होत असली तरी, लोकांना त्याबद्दल नेहमीच प्रचंड कुतूहल असते अशा ठिकाणी न चुकता पर्यटक भेटी देतात उदा. पानिपत, हिरोशिमा-नागासाकी इत्यादी

**II. ऐतिहासिक स्मारके**

ऐतिहासिक स्मारकाचा पर्यटन विकासावर परिणाम होत असतो. उदाहरणार्थ श्रीरंगपट्टणम येथील टिपू सुलतानाचे स्मारक. या ठिकाणी दरवर्षी हजारो पर्यटक भेटी देतात.

**III.किल्ले**

शत्रूपासून संरक्षण, शत्रूच्या हल्ल्याचा प्रतिकार, संपत्ती व जीवन यांचे रक्षण, किल्ल्यामुळे साध्य होते. किल्ल्याचे भुईकोट, डोंगरी आणि जलदुर्ग असे तीन प्रकार पडतात. किल्ल्याचा इतिहास माहीत करून घेण्यासाठी किल्ले असलेल्या ठिकाणी हजारो पर्यटक भेटी देतात. किल्ल्यावरती जाताना अनेक पायऱ्या असतात त्या पायऱ्या ओलांडताना जी मजा असते ती मजा अनुभवण्यासाठी हजारो पर्यटक किल्ल्यांच्या ठिकाणी भेटी देतात.उदा. दौलताबाद, चितोड, सिंधुदुर्ग, लाल किल्ला, रायगड, प्रतापगड, शिवनेरी, सिंहगड, विजयदुर्ग,

ग्वाल्हेरचा किल्ला इत्यादी.

**IV. ऐतिहासिक राजवाडे**

ज्या ठिकाणी ऐतिहासिक राजवाडे आहेत अशा ठिकाणी पर्यटक भेटी देतात. त्यामुळेच राजवाडे हे पर्यटन विकासावर परिणाम करताना दिसून येतात. उदा. मैसूरचा महाराजा पॅलेस, कोल्हापूरचा न्यू पॅलेस, राजस्थानमधील राजवाडे इत्यादी.

**V.ऐतिहासिक राजधान्या**

राजधान्याचा पर्यटन विकासावर परिणाम झालेला दिसून येतो. त्या ठिकाणी हजारो पर्यटक वर्षाला भेटीत देतात, त्या राजधानीचा इतिहास अभ्यासतात. उदा. हम्पी, विजापूर, श्रीरंगपट्टनम, पणजी, हैदराबाद, दिल्ली, जम्मु, चंदिगड, चितोडगड इत्यादी.

अशा प्रकारे पर्यटन विकासावर वरील ऐतिहासिक घटकाचा प्रभाव पडलेला दिसून येतो.भविष्यामध्ये या ऐतिहासिक घटकाचा विकास पर्यटन महामंडळाने केला तर पर्यटकांची संख्या वाढू लागेल कारण सर्व ऐतिहासिक अवशेष नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत त्याचा विकास आराखडा करून विकास करून पर्यटनस्थळाकडे पर्यटकांची गर्दी वाढवणे गरजेचे आहे.

**२.३ सांस्कृतिक घटक** (Cultural components)

पर्यटन केंद्रे ही त्याच्या सांस्कृतिक महत्त्वामुळे विकसित झालेले आहेत. यामध्ये शिल्पकला, कला, स्थापत्य कला, संगीत, नृत्य, नाट्य व चित्रकला, साहित्य,सण आणि उत्सव इत्यादी घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांमुळे भारतामध्ये अनेक पर्यटन स्थळे निर्माण झालेली आहेत.

**I.शिल्पे**

शिल्पामध्ये गूफातील कोरीव काम, मंदिरे व ऐतिहासिक वस्तू वरील कोरीव काम, स्मारके व मूर्तीवरील कोरीवकाम यांचा समावेश होतो. उदा. अजिंठा वेरूळच्या लेणीतील शिल्पकला, ताजमहल मधील शिल्पकला, मिनाक्षी मंदिरावरील शिल्प, खजुराहो येथील शिल्पकला यामध्ये प्राचीन संस्कृतीचे चित्र उत्तम प्रकारे रेखाटलेले आहे. ही शिल्पे अतिशय अप्रतिम असल्याने ही प्रसिद्ध सांस्कृतिक केंद्रे बनले आहेत येथे परदेशी व स्वदेशी हजारो पर्यटक भेटी देतात.

**II.कला**

वस्त्रावरील कला, लाकडावरील कला, धातूच्या वस्तू वरील कला, इत्यादीचा यामध्ये समावेश होतो. या कलेमुळे ही ठिकाणी पर्यटन केंद्र प्रसिद्धीला येतात. उदा. बनारस येतील वस्त्रावरील आकर्षक काम, मैसूर, बेंगलोर येथील चंदनाच्या लाकडावरील नक्षीकाम, मुर्दाबाद येतील पितळी भांड्यावरील आकर्षक काम, सावंतवाडी येथे लाकडावरील आकर्षक नक्षीकाम, कोल्हापुरी चप्पल इत्यादी

**III.स्थापत्याकला**

इमारतीचे बांधकाम व त्यावरील आकर्षण असे कोरीवकाम यांचा यामध्ये समावेश होतो. उत्तर भारतातील मोगलकालीन वैभवशाली राजवाडे, त्या काळातील स्थापत्य कलेच्या श्रीमंतीची साक्ष देतो. उदा. लखनऊ, दिल्ली, आग्रा इत्यादी. तसेच राजस्थानमधील जयपूर, उदयपुर, जैसलमेर, बिकानेर, मेवाड येथील राजपूतकालीन स्थापत्य कलेच्या दृष्टीने प्रसिद्ध असून ती संस्कृती केंद्र बनलेले आहेत.येते वर्षाला हजारो पर्यटक भेटी देतात.

**IV.संगीत**

संगीत ही अत्यंत जुनी कला आहे यात सतार, विणा इत्यादी वाद्याचा समावेश होतो. भारताला संगीताची दीर्घ परंपरा आहे. शास्त्रीय संगीत ही देशाला लाभलेली देणगी आहे. मनोरंजनाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून पर्यटनात संगीताला महत्व आहे.

**V. नृत्य**

भारत देशाला नत्य व संगीताची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. यामुळे येथे विविध नृत्यप्रकार पाहावयास मिळतात. उदा. कथक (लखनऊ, वाराणसी, जयपुर) भरतनाट्यम, कुचिपुडी (कर्नाटक, आंध्रप्रदेश) कथकली (केरळ) ओडिसी (ओरिसा) मणिपुरी (मणिपूर) इत्यादी

भारतातील विविध नृत्यप्रकार बरोबर भिन्न भिन्न लोकनृत्य ही आढळतात. लोकनृत्यातून मानवी भावना व्यक्त केल्या जातात. उदा. भांगडा (पंजाब) रासलीला, पांगी नत्य (हिमाचल प्रदेश) धूमयाल धूम (हरियाणा) तारताली (राजस्थान) नागा (मणिपूर, त्रिपुरा, नागालँड, मिझोराम, अरुणाचल प्रदेश, आसाम) बांबू नृत्य (मिझोराम) गरबा-दांडिया (गुजरात) दिंडी, लेझीम, लावणी (महाराष्ट्र) करगम (तामिळनाडू) इत्यादी.

**VI.उत्सव, सण**

उत्सवामुळे पर्यटक आकर्षित होतात उदा. मुंबई, पुणे, कोल्हापूर मधील गणेश उत्सव, म्हैसूरचा दसरा, गोव्यातील नाताळाचा सण, 32 शिराळा मधील नागपंचमी उत्सव तसेच अलीकडे कोल्हापूरला साजरा होणारा दसरा महोत्सव.

भारतात धार्मिक परंपरेनुसार अनेक सण साजरे केले जातात उदा. मकर संक्रांत (महाराष्ट्र) पोगल (तामिळनाडू, आंध्रप्रदेश) राष्ट्रीय पतंग महोत्सव (गुजरात) वसंत पंचमी (उत्तर भारत) जन्माष्टमी, नवरात्री, दसरा शरद पूर्णिमा, दिवाळी, ख्रिसमस, महाशिवरात्रि, होळी, रामनवमी, ईद-ए-मिलाद, गुड फ्रायडे (संपूर्ण भारत) बैसाखी (पंजाब) गुढीपाडवा (महाराष्ट्र) रथयात्रा (ओरिसा) ओनम (केरळ) नागपंचमी (पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, दक्षिण भारत) रक्षाबंधन (उत्तर भारत) गणेश चतुर्थी (महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक)दुर्गापूजा (पं.बंगाल) पुष्कर यात्रा (राजस्थान) कोणार्क उत्सव (ओरिसा) अशा प्रकारे अनेक सण व उत्सव भारतात साजरे केले जातात हे पाहण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक सहभागी होत असतात.

VII. **नाट्य व चित्रकला**

मुंबई, पुणे, कोल्हापूर येथे नाट्यकला खूप विकसित झाली आहे. चित्रकलेला ही सांस्कृतिक दृष्ट्या तितकेच महत्त्व आहे.

**VIII.हस्तकला**

काश्मीरच्या शाली व गालिचे, बेंगलोर , मैसूरच्या रेशमी साड्या, चंदनाच्या वस्तू, इंदूरची पैठणी, माहेश्वरी साड्यांची प्रदीर्घ परंपरा निर्माण झालेली आहे याचा पर्यटन विकासावर परिणाम होतो.

**IX.शैक्षणिक संस्था**

उच्च शिक्षण, संशोधन करण्यासाठी जगात प्रसिद्ध असलेल्या ठिकाणी देशी-विदेशी विद्यार्थी भेटी देतात उदा. इंग्लंडमधील केंब्रिज, ऑक्सफर्ड, भारतातील पुणे-कोल्हापूर, शांतिनिकेतन, मुंबई इत्यादी

वरील संस्कृतीक घटकाशिवाय साहित्य, मनोरंजन, भाषा, लेझीम, पोवाडा इत्यादी सांस्कृतिक घटकाचा ही पर्यटनाच्या विकासावर परिणाम होतो.

**२.४ इतर घटक** (Other components)

भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकाप्रमाणेच आर्थिक घटक, आर्थिक घटका बरोबर औद्योगिक नगरे, जाहिराती, फिल्मसिटी, आयुर्वेदिक हेल्थ सेंटर यांचाही पर्यटनाच्या विकासावर परिणाम होतो

**१.वाहतूक**

पर्यटनाच्या मूलभूत घटकांपैकी वाहतूक हा एक घटक आहे. पर्यटकाला त्याच्या इच्छित स्थळी जाण्यासाठी कोणत्या ना कोणत्या तरी वाहतूक साधनांची आवश्यकता असते. वास्तविक प्रवासाची पूर्वतयारी म्हणजेच वाहतुकीचा विचार अग्रक्रमाने करणे होय. भुमार्ग, जलमार्ग, हवाईमार्ग यांचा पर्यटन विकासावर परिणाम होतो.

आज देशांतर्गत पर्यटनासाठी रेल्वे हे एक प्रमुख वाहतुकीचे साधन बनलेले आहे. रेल्वेने देशाच्या सर्व भागात संपर्क निर्माण केला जातो. त्यामुळे पर्यटन व्यवसायाचा विकास रेल्वेमुळे मार्गामुळे झालेला दिसून येतो. रेल्वे हे रस्ते वाहतूक पेक्षा स्वस्त आहे. त्यामुळे पर्यटक पर्यटन विकासात रेल्वे वाहतुकीचा मोठा सहभाग आहे. भारतात अलीकडे मोटरीचा पर्यटनात मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून येतो. कारण कुटुंबातील सर्व सदस्य जवळच्या पर्यटनस्थळी मोटरीने जाऊ शकतात.

आंतरराष्ट्रीय पर्यटन विकासात हवाई वाहतुकीला अनन्यसाधारण महत्त्व आलेले आहे. अंतरावरील व आंतरखंडीय प्रवासासाठी हवाई वाहतुकी शिवाय पर्याय नाही. हवाई वाहतुकीमुळे दूर अंतरावरील दुर्गम प्रदेशातील पर्यटन ठिकाणांना कमीत कमी वेळेत जाता येऊ शकते. नेपाळ सारख्या हिमालयाच्या कुशीतील देशाचा, दक्षिण अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया इत्यादीसारख्या दूरच्या प्रदेशातील पर्यटन हवाई वाहतूकीमुळे शक्य झाला आहे.

एकोणिसाव्या शतकात पर्यटन विकासात सागरी वाहतुकीने महत्त्वपूर्ण कार्य केले. सागरी वाहतुकीने परदेशी पर्यटनास चालना मिळाली. अशा प्रकारे ज्या देशांमध्ये पर्यटन स्थळा जवळ वाहतुकीचा विकास झालेला आहे अशाच ठिकाणी पर्यटन केंद्र विकसित झालेले आहेत. ज्या ठिकाणी वाहतुकीची सोय नाही अशा ठिकाणी पर्यटनाचा विकास झालेला नाही. यामुळेच वाहतूक सुविधा व पर्यटनाचा जवळचा संबंध आहे.

**२.निवास व्यवस्था/ राहण्याची सोय**

पर्यटन व्यवसायाचा एक महत्त्वाचा मूलभूत घटक म्हणजे निवासव्यवस्था होय. परदेशी पर्यटकांना उपलब्ध करून दिलेल्या निवास व भोजन व्यवस्थेवर त्या पर्यटनस्थळाचा विकास अवलंबून असतो. कारण परदेशी पर्यटन केवळ उत्कृष्ट निवासव्यवस्था उपलब्ध असलेल्या पर्यटन स्थळाचा पसंती देतात. निवास व्यवस्थेत भोजन व पेयपान यांचाही समावेश होतो. अनेक देशात पर्यटन विकासात निवास व्यवस्थेला प्राधान्य दिले जाते. त्यासाठी सरकार काही सवलती देतात.

चांगल्या प्रकारच्या हॉटेलची निवासाची सोयही पर्यटन विकासातील एक मूलभूत गरज आहे. निवास व्यवस्था, तिचा दर्जा व उपलब्धता यावर पर्यटन व्यवसायाचा विकास अवलंबून आहे. वर्ल्ड टुरिझम ऑर्गनायझेशन पर्यटनात उपयुक्त अशा निवासी व्यवस्थेचे दोन गट पडले आहेत त्यातील

१.हॉटेल व तत्सम व्यवस्था:- यामध्ये हॉटेल ,मॉटेल्स, बोर्डिंग हाउस, यांचा तर

२.निवासाची पर्यायी व्यवस्था:- यामध्ये भाड्याने घेतलेल्या खोल्या, अपार्टमेंट्स, घरे इत्यादीचा समावेश होतो.

अशाप्रकारे पर्यटन स्थळाचा विकास होण्यासाठी वरीलपैकी काही निवास व्यवस्था असेल तरच तेथील पर्यटनाचा विकास होईल अन्यथा पर्यटनाचा विकास होणार नाही. यामुळेच पर्यटन व निवासव्यवस्था यांचा पर्यटन विकासामध्ये महत्त्वाचा वाटा आहे.

**3. औद्योगिक नगरे:-**

औद्योगिक नगराचा ही पर्यटनाच्या विकासावर परिणाम होतो. उदा.भारतातील पुणे, मुंबई इत्यादी

**४. जाहिराती:-**

जाहिरातीचाही पर्यटनाच्या विकासावर परिणाम झालेला दिसून येतो. पर्यटन स्थळाची जाहिरात जास्त होते त्या ठिकाणी पर्यटक जास्त भेटी देतात.

**५. फिल्मसिटी**:-

काही नगरांमध्ये सर्व पर्यटकांना आवश्यक असणारे मनोरंजन एकाच छताखाली दिले जाते.त्याठिकाणी पर्यटनाचा विकास झालेला दिसून येतो. उदा.रामोजी फिल्मसिटी, डिजनी वर्ल्ड (मुंबई) अप्पू घर (पुणे)

**६. आयुर्वेदिक हेल्थ सेंटर**

तसेच आजच्या या मानवाच्या गतिमान जीवनामध्ये आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. काही रोग चांगल्या हवामानामध्ये व्यवस्थित होऊ शकतात म्हणून आज भारतामध्ये काही ठिकाणी आरोग्यवर्धन आयुर्वेदिक हेल्थ सेंटर उभा केली जात आहेत. त्या ठिकाणी सुद्धा पर्यटनाचा विकास झालेला दिसून येतो. याच आधारे आयुर्वेदिक हेल्थ रिसॉर्ट( केरळ) पतंजली योगपीठ (वाराणसी) होमिओपॅथिक सेंटर (पंजाब) प्रेशर व ॲक्युपंचर सेंटर (भारत व चीन)

---

## स्वाध्याय

**खालील प्रश्नासाठी योग्य पर्याय निवडा**

१.कोणत्या भागात पर्यटन केंद्राचा विकास जास्त होतो

अ) डोंगराळ ब) किनारी क) खंडांतर्गत ड) पठारी

२.गोकाक धबधबा कोणत्या नदीवर आहे

अ) घटप्रभा ब) कृष्णा क) कावेरी ड) गंगा

३.उटी हे कोणत्या प्रकारचे पर्यटन केंद्र आहे

अ) धार्मिक ब) सांस्कृतिक क) थंड हवेचे ड) शैक्षणिक

४.महाराष्ट्रातील खाऱ्या पाण्याचे सरोवर कोणते

अ) चिल्का ब) सांबर क) लोणार ड) दाल

५.महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे

अ) सातारा ब) सांगली क) कोल्हापूर ड) पुणे

६.काश्मीर मधील कोणती दरी पर्यटनाच्या दृष्टीने प्रसिद्ध आहे

अ) रिफ्ट व्हॅली ब) किड्डदार व्हॅली क) सायलेंट व्हॅली ड) यापैकी नाही

७.जोग चा धबधबा कोणत्या नदीवर आहे

अ) कावेरी ब) शरावती क) कृष्णा ड) गंगा

८.गंगा नदीच्या काठावर कोणते पवित्र धार्मिक ठिकाण आहे

अ) वाराणसी ब) पंढरपूर क) मथुरा ड) आयोध्या

९.चंद्रभागा नदीच्या काठावर कोणते धार्मिक ठिकाण आहे

अ) शिर्डी ब) अक्कलकोट क) पंढरपूर ड) नरसिंहवाडी

१०.हिमाचल प्रदेशात पर्यटनासाठी कोणती दरी प्रसिद्ध आहे

अ) व्हॅली ऑफ फ्लॉवर्स ब) सायलेंट क) काश्मिर ड) रिफ्ट

११.पंचगंगा व कृष्णा नदीच्या संगमावर कोणते धार्मिक ठिकाण आहे

अ) पंढरपुर ब) नरसिंहवाडी क) कोल्हापुर ड) ज्योतिबा

१२.ज्यू धर्मीयांचे जगप्रसिद्ध धार्मिक ठिकाण कोणते

अ) जेरुसलेम  ब) अलाहाबाद  क) मक्का मदिना  ड) नांदेड

१३.जबलपूर येथे कोणत्या नदीने संगमरवरी खचदरी तयार केली आहे

अ) तापी  ब) नर्मदा  क) गोदावरी  ड) कोशी

१४.कर्नाटकात शरावती नदी वर जगप्रसिद्ध कोणता धबधबा आहे

अ) गोकाक  ब) जोग  क) दूध सागर  ड) लिंगमळा

१५. कोणता शास्त्रीय नृत्य प्रकार भारतातील वैभवशाली परंपरा दर्शवते

अ) कथकली  ब) बांगडा  क) लेझीम  ड) पोवाडा

१६. काश्मीरमध्ये कोणत्या हस्तकला उद्योगाचा विकास झाला आहे

अ) पैठणी साड्या  ब) चंदनाच्या वस्तू  क) लाकडी वस्तू  ड) शाली व गालिचे

१७.कोणत्या वाहतूक सुविधेमुळे देशांतर्गत पर्यटनात वाढ झाली

अ) रस्ते व रेल्वे  ब) हवाई  क) जलवाहतूक  ड) यापैकी नाही

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा**

१.पर्यटन विकासातील भूरूपांचे महत्त्व विशद करा

२. वनस्पती व पर्यटन

३.हवामान व पर्यटन

४.पर्यटन विकासावर परिणाम करणारा धार्मिक घटक

५.पर्यटन विकासावर परिणाम करणारा संस्कृतीक घटक

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा**

१.पर्यटन विकासावर परिणाम करणाऱ्या भौगोलिक घटकाचे वर्णन करा

२. पर्यटन विकासावर परिणाम करणाऱ्या सामाजिक व संस्कृतिक घटकाचे महत्त्व स्पष्ट करा

३. पर्यटन विकासावर परिणाम करणाऱ्या ऐतिहासिक घटकाचे वर्णन करा